॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon




## जनसंपर्क विभाग

जळगाव २८, (प्रतिनिधी) : विद्यापीठाची गुणवत्ता अधिक वाढीला लागावी तसेच परीक्षा संदर्भातील जाणवणाऱ्या त्रुटी दूर व्हाव्यात यासह इतर अनेक विषयावर अधिसभा सदस्यांनी शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत सविस्तर चर्चा केली. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सदस्यांच्या शंकाचे निरसन केले. दरम्यान विद्यापीठाच्या सन २०२३-२४ च्या लेखा परिक्षण अहवालाला अधिसभेने मान्यता दिली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक दि. २८ सप्टेंबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे उपस्थित होते. प्रारंभी माजी मंत्री रोहिदास पाटील, प्रा.पी.जे. पाटील, डॉ. सुभाष चौधरी, ॲड व्ही.व्ही. सरोदे तसेच विद्यार्थी प्रतिक गोरडे यांना सभागृहाने श्रध्दांजली अर्पण केली. प्रश्नोत्तराच्या तासात नरेंद्र नारखेडे, डॉ. ऋषिकेश चित्तम, नितीन ठाकूर, स्वप्नाली महाजन – काळे, प्रा. धिरज वैष्णव, प्रा. एकनाथ नेहते यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. प्रा.म.सु.पगारे, प्रा.शिवाजी पाटील, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, डॉ. पवित्रा पाटील, प्रा. महेंद्र रघुवंशी यांनी या प्रश्नांची उत्तरे दिली. विद्यार्थी विकास विभागाचा अहवाल वर्षातून दोन वेळा अधिसभेच्या बैठकीत मंजूरीसाठी मांडण्यात यावा. प्राध्यापकांच्या बढतीसाठी जिल्हानिहाय कॅसचे कॅम्प घेण्यात यावेत. तक्रार निवारण समितीची माहिती प्रत्येक महाविद्यालयांकडून मागविण्यात येवून अधिसभेसमोर ठेवली जावी. पेपर तपासणीत चुका राहू नयेत, रिड्रेसल साठी १०% गुणांची अट असलेला ऑर्डिनन्स बदलण्यात यावा, तात्काळ मिळणाऱ्या पदवी प्रमाणपत्राचा कालावधी कमी करावा, विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तींची प्रकरणे तात्काळ मार्गी लावावीत आदी विषयांवर सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सदस्यांच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन करतांना विद्यापीठ हे पारदर्शी कारभार करत असून विद्यार्थी हिताचे निर्णय घेण्यासाठी कटिबध्द आहे असे सांगून सदस्यांच्या सूचनांचा विचार केला जाईल असे सांगितले.

आर्थिक वर्ष २०२३-२४ चा लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक हिशोब पत्रके अधिसभेसमोर मांडण्यात आलेत. यावर सविस्तर चर्चा झाली. ऑडिटरने सुचविलेल्या सूचनांचे पालन केले जावे अशी अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली. वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील यांनी हा अहवाल सादर केला. तो अधिसभेने मान्य केला. विद्यापीठ विकास गुणवत्ता वाढीसाठी डॉ. इंद्रसिंग पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीचे सभावृत्त अधिसभेसमोर सादर करण्यात आले. त्यावर सविस्तर चर्चा झाली. प्रत्येक महाविद्यालयात करीअर कौन्सीलींग सेंटर स्थापन करण्यात यावे, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी यासाठी महाविद्यालयांनी आराखडा तयार करावा व वाचन संस्कृती वाढवावी, आदिवासी विद्यार्थ्यांचे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कौशल्य ओळखून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करावे, सांस्कृतिक मार्गदर्शन केले जावे, जिल्हानिहाय रोजगार मेळावे घेतले जावे या मुद्यांवर सदस्यांनी आपली मते व्यक्त केली.

या सभेला प्रा. अनिल डोंगरे, प्राचार्य डॉ. एस.एस. राजपूत, डॉ. जगदीश पाटील, प्राचार्य डॉ. साहेबराव भुकन, प्रा. योगेश पाटील, सीए. रवींद्र पाटील, डॉ. राजेश जवळेकर, डॉ. विजय आहेर, डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. दिनेश पाटील, प्रा. आशुतोष पाटील, प्राचार्य संजय सुराणा, प्राचार्य संजय भारंबे, प्राचार्य सुनील पवार, प्राचार्य वैशाली पाटील, निशांत रंधे, विलास जोशी, प्रा. एकनाथ नेहेते, प्रा.संदीप नेरकर, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. गजानन पाटील, प्रा. जयवंत मगर, डॉ. श्रीमती मंदा गावित, प्रा. सुरेखा पालवे, प्रा. पद्माकर पाटील, प्रा. वर्षा पाटील, प्रा. अजय पाटील, प्रा. विशाल पराते, प्रा. किर्ती कमळजा, ॲड अमोल पाटील, विष्णु भंगाळे, अमोल मराठे, सुनील निकम, अमोल सोनवणे, नितीन झाल्टे, दिनेश चव्हाण, स्वप्नाली महाजन-काळे, नितीन ठाकूर, केदारनाथ कवडीवाले, भानुदास येवेलेकर, नरेंद्र नारखेडे, ॲड. केतन ढाके, जयंत उत्तरवार, रामसिंग वळवी, श्रीमती मिनाक्षी निकम, दीपक पाटील, श्रीमती सुरेखा पाटील, डॉ. ऋषीकेश चित्तम तसेच निमंत्रीत सदस्य प्रा. म.सु. पगारे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी आभार मानले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २८ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी